महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मीरा-भाईंदर महानगरपालिकेची स्वतंत्र विकास आराखडा नियमावली मंजूर करण्याबाबत

(१) ३१८५ (२३-१२-२०१४). श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेची स्वतंत्र विकास आराखडा नियमावली मंजूर झाली आहे काय, हे खरे आहे काय,

(२) अयल्यास, महानगरपालिकेचे शासनाकडे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम सन १९६६ चे कलम ३७ चे मॉडिफीकेशनचा प्रस्ताव, फेरबदल व नवीन नियमाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकूण किती व कोणकोणते प्रस्ताव प्रलंबित आहेत,

(४) असल्यास, प्रलंबित प्रस्तावाचे निर्णय कधीपर्यंत होणार आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१७) :(१) होय.

(२) होय.

(३) व (४) यासंदर्भात आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवाल व अभिलेखाची पडताळणी केली असता, मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे एकूण ७ प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहेत. त्यापैकी ३ प्रस्ताव मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये व उर्वरित प्रस्ताव विकास योजनेमध्ये बदल करणेबाबत आहेत. सदर प्रस्तावांची छाननी सुरु असून या प्रस्तावांवर लवकरात लवकर निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

राज्यातील महानगरपालिकांनी ठाणे, मुंबई, मिरा भाईंदर येथे
मांस विक्रिवर बंदीचा प्रस्ताव पारित केल्याबाबत

(२) ३८२२६ (२३-१२-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, मुंबई, मिरा भाईंदर महानगरपालिकांनी मांस विक्रिवर बंदीचा प्रस्ताव पारीत करुन तसेच याबाबत परस्पर बंदीचा निर्णय घेऊन इतरांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणल्याने यासंदर्भात योग्य कारवाईची मागणी विविध सामाजिक, धार्मिक संघटनांचे पदाधिकारी, जागरुक नागरीकांनी माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री (नगरविकास/गृह), जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतीय घटनेच्या अनुच्छेद २५ आणि २६ अनुसार धर्म आणि धार्मिक प्रथा याबाबतही मांस खाणे त्या एखाद्या धर्माची प्रथा असू शकते व त्या आधारे सदरील एकतर्फी मांस बंदी लागू ठरत असल्याने शासनातर्फे अशा तऱ्हेचे स्थानिक स्वराज्य संस्थेनी घेतलेले निर्णय/प्रस्ताव रद्द करण्याचा निर्णय भविष्यात घेतला जाईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रकरणी शासनामार्फत सर्वधर्मिय समान स्वातंत्र्य बहाल करण्याच्या दृष्टीने कोणता निर्णय घेण्यात आला वा प्रस्तावित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१७) :(१) मीरा-भाईंदर महानगरपालिका महासभेत पर्युषण पर्वामध्ये मांस व मटण विक्री दुकाने बंद ठेवण्याचा ठराव मंजूर झालेला होता.

शासन पत्र दि.७ सप्टेंबर, २००४, दि.२२ जुलै, २००९ नुसार दि.१० सप्टेंबर, २००५ व दि.१७ सप्टेंबर, २००५ या दोन दिवशी, तसेच दि. ११ सप्टेंबर, २०१५ ते १६ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत कत्तलखाने, मांस विक्री दुकाने बंद करण्याबाबत मीरा-भाईंदर महानगरपालिकने दि.९ सप्टेंबर, २०१५ अन्वये आवाहन केले आहे.

मीरा-भाईंदर महानगरपालिकेने पारीत केलेल्या ठरावाच्या विरोधात महानगरपालिकेकडे तक्रारी प्राप्त आहेत.

ठाणे महानगरपालिकेतर्फे पर्युषण पर्वातील श्रावण वद्य १२ व भाद्रपद शुध्द ४ या दिवशी कत्तलखाने व मांस विक्री दुकाने बंद करण्यास स्थानिक वृत्तपत्रांद्वारे आवाहन केले जाते. या दिवशी ठाणे महानगरपालिकेचे दोन्ही कत्तलखाने बंद ठेवण्यात येतात. मांस विक्री दुकाने बंद ठेवण्यासाठी सक्ती न करता विनंती करण्यात येते. मिरवणूकी दरम्यान १ ते २ तासांसाठी दुकानदार स्वत:हून दुकाने बंद ठेवतात. शहराच्या इतर भागात मांस विक्री दुकाने सुरु असतात. ठाणे महानगरपालिकेने मांस विक्रीवरील बंदीचा ठराव पारीत केलेला नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने मांस विक्रीकरीता बंदीबाबत ठराव पारीत केलेला नाही.

उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. २२६२/२०१५ संदर्भात मा.न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्राकरीता शासनपत्र दि.७ सप्टेंबर, २००४ ला स्थगिती दिलेली आहे.
(२), (३) व (४) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ नुसार कत्तलखाने संदर्भात विनियमन करण्याचे विहित केलेले आहे.

तसेच शासनपत्र दि.१२ मे १९८८, दि.२८ मार्च, २००३ व दि.०७ सप्टेंबर, २००४ अन्वये काही दिवशी कत्तलखाने / मांस विक्री दुकान बंद ठेवण्यासंदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचना महानगरपालिका व नगरपरिषदांना दिलेल्या आहेत.

मारेगाव नगरपंचायत (ता.वणी, जि.यवतमाळ) येथे मुख्याधिकारी यांच्या नियुक्तीबाबत

(३) ४८०९८ (१७-०५-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगाव (ता.वणी, जि.यवतमाळ) येथे नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायतीस गेल्या सहा महिन्यांपासून मुख्याधिकारी नसल्याने नगरपंचायतीचा कारभार ठप्प असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नगरपंचायतीचा कारभार वणी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे असल्याने शहरातील अनेक महत्वाच्या जागांवर अतिक्रमण वाढले असून मनमानी पध्दतीने नवीन बांधकाम सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मारेगाव नगरपंचायतीस तातडीने मुख्याधिकारी नेमून नगरपंचायतीतील नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) नाही.

(२) नाही.

(३) दि. १६.८.२०१६ पासून मारेगाव नगरपंचायत येथे मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) लागू नाही.

चाकण, आळंदी, राजगुरुनगर नगरपरिषदलगत गावांत मोठया प्रमाणात औद्योगीकरण आणि नागरीकरण झाल्याने हद्दवाढ करणेबाबत

(४) ४८४५१ (१७-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण, आळंदी, राजगुरुनगर नगरपरिषदेलगत गावांत मोठया प्रमाणात औद्योगीकरण आणि नागरीकरण झाल्याने सदर गावे नगरपरिषद हद्दीत समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नगरपरिषदांची हद्द वाढ करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांनी सचिव, नगरविकास यांस माहे जानेवारी, २०१६ वा त्यासुमारास पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१), (२) व (३) पुणे जिल्हयातील चाकण व राजगुरुनगर या नगरपरिषदांची हद्दवाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. यातील प्रस्तावित हद्दवाढीत औद्योगीक क्षेत्रांचा / विशेष आर्थिक क्षेत्रांचा समावेशनाची बाब संबंधित विभागांकडून तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणू नगरपरिषद (जि.पालघर) क्षेत्रात विनापरवानगी केलेले बांधकाम तोडण्याबाबत

(५) ५३०१० (१७-०५-२०१६). श्री.अमित घोडा (पालघर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू नगरपरिषद क्षेत्रातील (जि.पालघर) डहाणू त्र्यंबक राज्य मार्ग ३० रस्त्यांच्या कडेने साखळी क्र. १/२०० मध्ये विनापरवानगी रस्त्यांच्या बाजूला मालकाने पक्के बांधकाम केले असल्यामुळे सदरहू बांधकाम नगरपरिषदेच्या हद्दीत येत असून नगरपारिषदेने त्वरीत बांधकाम तोडण्याची कारवाई करावी अन्यथा हे बांधकाम तोडण्याची कारवाई सार्वजनिक बांधकाम विभाग करेल असे आश्वासन मा. सार्व. बांधकाम मंत्री महोदयांनी मार्च, २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालकाने पक्के बांधकाम सुरु करण्यापूर्वी सार्व-बांधकाम उपविभाग, डहाणू यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र वा परवानगी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकाम तोडले नसल्यामुळे नगरपरिषदेच्या हद्दीत मुख्य रस्त्यालगत बरीचशी अनधिकृत बांधकामे करण्यात आली असून ती तोडण्याबाबत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, डहाणू यांनी दिनांक १७/०६/२०१५ रोजी तसेच अनेक वेळा लेखी नोटीस देऊनही नगरपरिषदेने अनधिकृत बांधकामे तोडण्याची अद्याप कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू बांधकाम अद्यापही न तोडण्याची कारणे काय आहेत व ती बांधकामे केव्हापर्यंत तोडण्यात येतील ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

डहाणू नगरपरिषद हद्दीतून जाणाऱ्या राज्य मार्ग क्र.३० या रस्त्यालगतच्या एकूण तीन मालमत्ता धारकांना नगरपरषिदेने सन २०१३ ते सन २०१५ या कालावधीमध्ये बांधकाम परवानगी देण्यात आली होती.
(३) व (४) या प्रकरणी अनधिकृत बांधकामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपरिषद डहाणू यांनी संयुक्त पहाणी करुन संबंधित मालमत्ताधारकांना अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत नोटीस देण्यात आली होती.

यापैकी एका मालमत्ता धारकाने मा.दिवाणी न्यायालय, डहाणू येथे दावा दाखल केला. दिवाणी न्यायालय, डहाणू यांनी वादी व प्रतिवादी यांना स्थगिती आदेश देण्यात आलेले आहेत.

सदर आदेशाविरुध्द डहाणू नगरपरिषदेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४/०७/२०१६ रोजीच्या आदेशानुसार दिवाणी न्यायालयाचे आदेश पुढील सुनावणीपर्यंत कायम ठेवण्यात आलेले आहे.

मा.न्यायालयाचे स्थगिती आदेशामुळे सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलेले नाही.

मुंबई शहर आणि उपनगरातील एफ.एस.आय.मधील तफावत दूर करण्याबाबत

(६) ५५३१३ (२९-०८-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या नवीन विकास आराखड्यानुसार मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये एफ.एस.आय.मधील तफावत दूर करण्यात आली असून यापुढे मुंबईला एकसमान एफ.एस. आय. देण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय कधीपासून अमलात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१७) :(१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) नुसार मुंबई महानगरपालिकेने दि. २७ मे, २०१६ रोजी प्रारुप विकास आराखडा २०३४ प्रसिध्द करुन जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या. सदर प्रारुप विकास नियंत्रण नियमावली २०३४ चे खंड ३० तक्ता १२ नुसार मुंबई शहराकरीता निवासी / वाणिज्यिक पट्ट्यांकरीता क्षेत्रीय मूळ चटई क्षेत्र निर्देशांक ०.३४ व अनुमत विकास हस्तांतरणीय हक्क (टिडीआर) ०.३३ असे एकूण २ अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक देण्याचे प्रस्ताविले आहे.

तसेच उपनगरे आणि विस्तारित उपनगरातील बीएआरसीसाठी चिन्हांकित 'एन' विभागातील क्षेत्र आणि पूर्ण द्रुती महामार्गावर पश्चिमेला स्थित 'एन' प्रभागामध्ये समाविष्ट विभाग, उत्तरेकडे 'एन' विभागाची उत्तर सिम, पूर्वेला ठाणे खाडीपर्यंत आणि दक्षिणेकडे 'एन' विभागाच्या दक्षिण सीमारेषेपर्यंत या सीमेतील क्षेत्राकरीता निवासी / वाणिज्यिक पट्ट्यांकरिता क्षेत्रिय मूळ चटई क्षेत्र निर्देशांक ०.७५ प्रस्तावित असून आक्से, मार्वे गावातील आणि पी/उत्तर विभागातील एरंगळ, आर विभागातील गोराई आणि मनोरी गावांतील सीआरझेड बाधित क्षेत्र, गावठाण वगळून क्षेत्राकरीता निवासी/वाणिज्यिक पट्ट्यांकरीता क्षेत्रिय मूळ चटई क्षेत्र निर्देशांक ०.५० प्रस्तावित आह. तसेच सदर क्षेत्रांमध्ये अधिमूल्य आकारून अतिरिक्त चटई क्षेत्र व अनुमत विकास हस्तांतरणीय हक्क (टिडीआर) अनुज्ञेय केलेले नाहीत.

उपनगरातील तसेच विस्तारीत उपनगरामधील उर्वरित क्षेत्रामध्ये निवासी / वाणिज्यिक पट्ट्यांकरिता क्षेत्रीय मूळ चटई क्षेत्र निर्देशांक १.०० अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक ०.५० व अनुमत विकास हस्तांतरणीय हक्क (टिडीआर) ०.५ असे एकूण २ अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक देण्याचे प्रारुप नियमावलीनुसार प्रस्तावित आहे. असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि. २५/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (१) नुसार गठीत नियोजन समिती द्वारा जनतेमार्फत प्राप्त सूचना व हरकतींवर सुनावणीची कार्यवाही पूर्ण झाल्यावर नियोजन समितीच्या शिफारशीसह अंतिम प्रारुप विकास आराखडा महापालिकेला सादर केला जाईल तद्नंतर महापालिकेच्या मंजूरीने अंतिम प्रारुप विकास आराखडा शासनास महाराष्ट्र पोदशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ नुसार अंतिम मंजूरीसाठी सादर होणार आहे.

(२) व (३) सद्य:स्थितीत महापालिकेचे प्रारुप विकास योजना २०३४ प्रसिध्द झाल्यानुसार हरकती व सूचना कारांना सुनावणीची कार्यवाही सुरु असून वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३० नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकास योजना मंजूरीसाठी शासनास सादर केल्यावर अधिनियमाचे कलम ३१ नुसार अंतिम निर्णय शासनस्तरावर घेण्यात येईल.

ठाणे शहरातील डॉ.घाणेकर नाटयगृहाचे सिलिंग कोसळल्याबाबत

(७) ५६५७२ (२६-०८-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील डॉ.घाणेकर नाटयगृहाचे दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी सिलिंग कोसळल्याप्रकरणी सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१७) :(१) व (२) हे खरे आहे.

ठाणे शहरातील डॉ.काशिनाथ धाणेकर नाट्यगृहामध्ये सिलिंग कोसळल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली. सदर चौकशीमध्ये खालील अनियमितता निदर्शनास आल्या आहेत :-

(अ) प्लो स्विचच्या कंट्रोल पॅनलवर प्लोस्विचमधून पाण्याचा प्रवाह मोजण्याचे तंत्रज्ञान उपलब्ध नाही.

(ब) सदर नाट्यगृहात बसवलेल्या आग प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या वार्षिक निविदा व देखभाल व दुरुस्तीकरीता वार्षिक निविदा काढल्या नाहीत.

उक्त अनियमिततेस जबाबदार मुख्य अग्निशम अधिकारी व नाट्यगृह व्यवस्थापक यांना कारणे दाखवा नोटीस ठाणे महानगरपालिकेने बजावली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महापालिकांच्या शाळेत आग प्रतिबंधक यंत्रणेचा अभाव असल्याबाबत

(८) ५७४४६ (२६-०८-२०१६). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महापालिकांच्या शाळेत आग प्रतिबंधक यंत्रणेचा अभाव असल्याचे माहे एप्रिल, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार महापालिकांच्या शाळांत आगप्रतिबंधक यंत्रणा बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) महानगरपालिकांच्या कार्यक्षेत्रातील महापालिकांच्या शाळेची अग्निसुरक्षा यंत्रणेची तपासणी संबंधित महानगरपालिकांच्या अग्निशमन विभागाकडून करण्यात येते.
(३) शाळा / महाविद्यालयांमध्ये अग्निसुरक्षेसंबंधी करावयाच्या उपाययोजना शासन पत्र, नगर विकास विभाग, दिनांक ०५.०८.२००४ व शालेय शिक्षण विभाग दिनांक २२.०७.२००४ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात अद्ययावत अग्निशमन यंत्रणा व अग्निशमन प्रशिक्षण अकादमी स्थापन करण्याबाबत

(९) ५८४२० (२९-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: भिवंडी, डोंबिवली, कुलाबा, वरळी व इतर ठिकाणी मागील काही महिन्यांमध्ये भिषण आगी लागण्याच्या दुर्घटना सातत्याने होत असून जीवित व वित्त हानीही झाल्याचे माहे जानेवारी ते जून, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील आगी लागण्याच्या दुर्घटना आटोक्यात आणण्यासाठी प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारीवर्गाची मोठया प्रमाणावर आवश्यकता असल्याने प्रत्येक जिल्ह्याच्या

ठिकाणी अद्ययावत अग्निशमन यंत्रणा व अग्निशमन प्रशिक्षण अकादमी स्थापन करण्याबाबत लोकप्रतिनिधी, भिवंडी (पूर्व) यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच सदर आगीत मृत पावलेल्यांच्या कुटुंबियांना व जखमींना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्यातील आगी लागण्याच्या दुर्घटना आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांना अग्निशमन व विमोचनाचे प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई येथे कार्यरत आहे. येथे राज्यातील अग्निशमन सेवेतील कर्मचारी तसेच खाजगी उमेदवारांनाही ६ महिने कालावधीचे अग्निशमन प्रशिक्षण सत्रे आयोजित केले जातात. महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत प्रगत अग्निशमन प्रशिक्षण अकादमी तसेच प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अद्यावयात अग्निशमन यंत्रणा उभारण्याबाबत जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाची कार्यकक्षा विस्तारीत करण्यासाठी पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) लागू नाही.

वसई-विरार उप विभागाचा सर्वांगिण विकास करण्याबाबत

(१०) ५९९३७ (२६-०८-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार उपविभागाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी (JICA) कडून दिर्घमुदतीचे कर्ज वसई-विरार महानगरपालिकेस मिळण्याबाबत वसईच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :(१) होय.

(२) व (३) सदरचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

मुंबईचा स्मार्ट सिटी योजनेत समावेश करणेबाबत

(११) ६५००४ (१३-०२-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराची आर्थिक स्थिती सक्षम असल्याने केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत महापालिकेने स्मार्टसिटी योजना स्वखर्चाने राबवावी असे शासनाने सांगितले असल्याचे दिनांक २५ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महापालिकेकडे राज्य शासनाने पाठविलेला स्मार्ट सिटी योजनेचा प्रस्ताव पालिका आयुक्त अजोय मेहता यांनी शासनाकडे परत पाठविला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी व आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असल्याने मुंबई शहर स्मार्ट सिटी व्हावी अशी करोडो मुंबईकरांची अपेक्षा असल्याने मुंबईला स्मार्ट सिटी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१७) :(१) होय.

शासन निर्णय दिनांक १८ जून, २०१६ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याने स्मार्ट सिटी अभियान त्यांच्या स्वनिधीतून राबवावे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेला कळविण्यात आले आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईसह राज्यातील महानगरपालिकांच्या अग्शिमन दलाबाबत

(१२) ६५३६४ (१६-०१-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २६ महानगरपालिकांपैकी ८ महानगरपालिकांनी मागील पाच वर्षामध्ये अग्शिमन उपकरणे, साधनसामुग्री, वाहने इत्यादींच्या खरेदीसाठी त्यांच्या भांडवलातील ७८ टक्के रक्कम खर्च न केल्याचे कॅगच्या अहवालातून दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने इमारती, शैक्षणिक संस्था, रूग्णालये, मॉल, मल्टीप्लेक्स, उद्योग, सार्वजनिक जागा, उपहारगृहे आणि मोडकळीस

आलेल्या इमारतीच्या नियतकालिक तपासण्या न केल्यामुळे सन २०१० ते २०१५ या कालावधीत आगीचे भीषण अपघात घडले व जीवित तसेच मालमत्तेची हानी झाल्याचेही कॅगच्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार कोणत्याही जागेची तपासणी केल्याशिवाय त्यांना प्रमाणपत्र देता येत नसतानाही तपासणीशिवाय इमारतींना प्रमाणपत्र देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कॅगच्या अहवालातील आक्षेपानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) हो, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये मुंबई अग्निशमन दलामधील नामनिर्देशित अधिकाऱ्यांमार्फत नियमित तपासणी करण्यात येते. आतापर्यंत ४४८२ इमारतींची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी १८८१ इमारतींना नोटीस देण्यात आल्या आहेत व ७ इमारतींविरूध्द मुंबई अग्निशमन दलाने याचिका दाखल केल्या आहेत.

(३) व (४) विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या अनुषंगाने व महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३९० व ३९४ मध्ये असलेल्या तरतूदीनुसार इमारतीची तपासणी करून आगीचे धोके लक्षात घेता आग प्रतिबंधक उपाययोजना सुचविल्या जातात व त्यांची पूर्तता केल्यानंतरच भोगवटा प्रमाणपत्र दिले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेबाबत

(१३) ६५४५३ (१६-०१-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने स्मार्ट सिटी योजनेतील शहरांच्या यादीत महाराष्ट्र राज्यातील नागपूर, ठाणे, नाशिक या शहरांचा समावेश दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शहरांचा स्मार्ट सिटी योजनेंतर्गत विकास करण्यासाठी केंद्र शासनाकडून किती निधी कोण-कोणत्या योजनेंतर्गत शासनास मिळणार आहे तसेच शासन या योजनेसाठी किती निधी उपलब्ध करुन देणार आहे,

(३) असल्यास, सदर स्मार्ट सिटी योजनेंतर्गत करावयाच्या विकास व सुविधांची कामे महानगरपालिकांकडे सोपविण्यात येणार आहे काय किंवा सदर कामे कोणत्या माध्यमातून वा संस्थांकडून करण्यात येणार आहे,

(४) तसेच याबाबत शासनाने कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१७) :(१) होय.
(२) केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेच्या निकषा प्रमाणे प्रतिवर्षी केंद्र शासन रु.१०० कोटी, राज्य शासन रु.५० कोटी पुढील पाच वर्षे निधी देणार आहे. तसेच प्रतिवर्षी महानगरपालिकेचा रु.५० कोटी सहभाग राहिल.
(३) सदर विकासकामे महानगरपालिकेच्या माध्यमातून SPV ची निर्मिती करुन करण्यात येणार आहेत.
(४) होय.

नियोजित पनवेल शहर महानगरपालिका व सिडको प्रसिमांकित हद्दीत समाविष्ट असलेल्या भूभागांबाबत

(१४) ६५६०७ (१६-०१-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नियोजित पनवेल शहर महानगरपालिका व आसपासच्या नवी मुंबई सिडको प्रसिमांकित हद्दीत समाविष्ट असलेल्या भूभागांकरिता वाढीव शहर विकास प्रकल्पाबरोबरच नैना प्रकल्पांतर्गत नागरी सोयी-सुविधा प्रत्यार्पित करण्याबाबतची मागणी संबंधित नवनिर्मित पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीच्या सदस्यांनी गटनेते तसेच विविध महापालिका पक्षप्रतोद, स्थानिक सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी या बरोबरच आजी व माजी विधिमंडळ सदस्यांनी राज्याचे मा.मुख्यमंत्री (नगरविकास), राज्यमंत्री (नगरविकास), मुख्यसचिव (महाराष्ट्र राज्य), प्रधान सचिव (नगरविकास), तसेच रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि नगरविकास विभागाचे संबंधित अधिकारी, महानगर आयुक्त (पनवेल) तसेच नवी मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या पदाधिकाऱ्यांकडे दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने संबंधित प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) होय.
(२) प्रशासकीय व भौगोलिक सुलभतेच्या दृष्टिने २९ महसुली गावांचा पनवेल महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मे.रोमा बिल्डर यांनी ठाणे शहरातील स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्याबाबत

(१५) ६५९३९ (१६-०१-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी मे.रोमा बिल्डर यांनी बेकायदेशीररित्या बळकावल्या असुन ठाणे महापालिकेची फसवणूक करून जमिनी विकसित करून त्यातील प्लॉट तसेच दुकाने विकून गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करून बनावट कागदपत्रांच्या आधारे घेण्यात आलेल्या परवानग्याबाबत फेरविचार करण्यात यावा अशा आशयाच्या मागणीचे एक निवेदन लोकप्रतिनिधीनी सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे महानगरपालिका यांचेकडे दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू निवेदनानुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) ठाणे शहरातील स्थानिक शेतकऱ्यांच्या जमीनी मे.रोमा बिल्डर्स यांनी बेकायदेशीर बळकवल्या अशी तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच ही बाब ठाणे महापालिकेशी संबंधीत नाही.

ठाणे महापालिका क्षेत्रात मे.रोमा बिल्डर्स यांनी दाखल केलेल्या विकास प्रस्तावांना विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार वेळोवेळी मंजूरी देण्यात आलेली आहे.
(२) सदर प्रकरणी मा.आमदार श्री.नितेश राणे यांनी सहायक संचालक नगररचना, ठाणे महापालिका यांचेकडे दिनांक १९.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये निवेदन सादर केलेले आहे, हे खरे आहे.
(३) या प्रकरणी एकुण दाखल ७३ दाव्यांपैकी २८ दावे न्यायालयाने निकाली काढले आहेत. या दाव्यांपैकी केवळ दोन दाव्यांमध्ये ठाणे महानगरपालिका प्रतिवादी आहे. त्यापैकी एक दावा न्यायालयाने निकाली काढला आहे. तसेच उर्वरीत दाव्यातील प्रकरणी ठाणे महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिलेली नाही असे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल महानगरपालिकेतून ३६ गावे वगळण्यात आल्याबाबत

(१६) ६६९५१ (१६-१२-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाने दिनांक १६ मे, २०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेमध्ये होऊ घातलेल्या पनवेल महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत ६८ गावांची यादी प्रसिध्द करून हरकती व सूचना मागविण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची सुनावणी कोकण विभागीय आयुक्त यांच्यासमोर होऊन ग्रामस्थ, सरपंच, स्थानिक रहिवाशी तसेच राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीशी चर्चा करून सुनावणीची प्रक्रिया पार पाडल्यानंतर त्याबाबतचा अहवाल विभागीय आयुक्तांनी दिनांक २९ जुलै, २०१६

रोजी नगरविकास विभागाच्या सचिवांना पाठवून, सध्याच्या पनवेल नगरपरिषदेच्या भागासह प्रस्तावित ६८ गावांच्या समावेश करून पनवेल महानगरपालिका स्थापन करण्यात यावी अशी स्पष्ट शिफारस करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतानाही शासनाने दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी प्रस्तावित ६८ गावांपैकी ३६ गावे वगळून ३२ गावांचाच समावेश करण्यात येत असल्याची भूमिका मा.उच्च न्यायालयात मांडली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या गावांमध्ये, पनवेल शहरापासून जवळ असलेल्या गावांना वगळून दूरच्या गावांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी केलेल्या चौकशीत काय आढळून आले व वगळण्यात आलेल्या गावांचा पनवेल महानगरपालिकेमध्ये समावेश करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) प्रशासकीय व भौगोलिक सुलभतेच्या दृष्टीने २९ महसुली गावांना पनवेल महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार मधील अनधिकृत बांधकामे

(१७) ६७०२५ (१६-०१-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई लगत असणाऱ्या वसई-विरार मध्ये मुंबई आणि ठाण्यातील स्वस्त घरांचा पर्याय म्हणून घरे घेत असताना या शहरात अनधिकृत बांधकाम व्यावसायिक बनावट सीसी आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे अनधिकृत इमारती बांधून सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक करत असल्याची बाब माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १६८ अनधिकृत इमारती बांधकाम प्रकरणामध्ये नागरिकांची फसवणूक झाल्याने आयुक्त, वसई-विरार महानगरपालिकेने अनधिकृत बांधकाम व्यावसायिकांविरुध्द फसवणूक तसेच एमआरटीपीए नियमांतर्गत गुन्हे दाखल केले असल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ अखेर किती व कोणकोणत्या विकासकांवर कारवाई करण्यात आली आहे व अद्याप किती व कोणत्या विकासकावर कारवाई करणे बाकी आहे व सदरची कारवाई केव्हा पूर्ण करण्यात येईल,

(४) तसेच, सदरच्या बांधकाम प्रकरणी शासनाच्या ज्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले त्या शासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१), (२) व (३) वसई विरार शहर महानगरपालिकेने अनधिकृत इमारती बांधकामधारकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील कलम ५२,५३ व ५४ अंतर्गत २६१ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

तसेच खोटी बांधकाम आंरभ प्रमाणपत्र व बांधकाम पुर्णत्वाचा दाखला जोडणाऱ्या अनधिकृत बांधकाम धारकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम तसेच फौजदारी कायद्यातील कलम ४२०, ४६७, ४०५ अन्वये एकूण ७४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

तसेच सदरची प्रक्रिया निरंतर चालू असून वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी नियमोचित कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी शहरातील वाढत्या इमारतींच्या दुर्घटनांबाबत

(१८) ६७६५१ (१६-०१-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील कल्याण रोड, नेहरुनगर, नवी वस्ती येथील जीर्ण व धोकादायक इमारतीच्या तिसऱ्या मजल्याचा स्लॅब कोसळून ४ जण जखमी झाले असून इमारत दुर्घटनेच्या अशा अनेक घटना माहे जुलै ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी येथील जीर्ण झालेल्या इमारती कोसळून होणाऱ्या दुर्घटनामध्ये वाढ झालेली असल्यामुळे या इमारतीतील रहिवाशांना इतरत्र स्थलांतरित करुन मासिक घरभाडे देणे, पर्यायी तात्पुरती निवारा व्यवस्था करणे आणि रहिवाशांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांना रहिवास प्रमाणपत्र देण्याबाबतचा निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.पालकमंत्री-ठाणे यांनी जिल्हाधिकारी-ठाणे, आयुक्त-ठाणे व भिवंडी महानगरपालिका यांच्यासमवेतच्या बैठकीत घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दुर्घटनाग्रस्त इमारतीतील नागरिकांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत, अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत व धोकादायक इमारतीतील रहिवाशांना रहिवास प्रमाणपत्र देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

दिनांक ०८.०८.२०१६ रोजी स्लॅबचा काही भाग कोसळला आहे.

(२) दुर्घटनाग्रस्त इमारतीमधील रहिवाश्याची तात्पुरती व्यवस्था रात्र निवारा केंद्रात, महानगरपालिकेच्या सांस्कृतिक केंद्रात करण्यात येते.

शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२०१५ अन्वये रहिवाश्यांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी अतिधोकादायक इमारतीमध्ये रहिवाश्यांना रहिवास प्रमाणपत्रे दिलेली आहे.

(३) अतिधोकादायक इमारतीतील नागरिकांना या कार्यालयाकडून रहिवास प्रमाणपत्र देण्यात येत आहे. सदर इमारतीतील नागरिकांना महानगरपालिकेच्या वतीने तसेच शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी शहर महानगरपालिकेच्या शाळांबाबत

(१९) ६७६७२ (१६-०१-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेच्या शांतीनगर येथे असलेल्या उर्दू माध्यमिक शाळेत गेल्या तीन महिन्यापासून शिक्षक नसल्याने तसेच सौदागर मौहल्ला येथील उर्दू माध्यमांच्या २ शाळा बंद करण्याचा घेतलेल्या निर्णयामुळे शालेय विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असल्याच्या तक्रारी उपविभागीय अधिकारी व प्रशासन अधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे अनेक पालकांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सौदागर मौहल्ला या परिसरातील उर्दू माध्यमाच्या शाळा क्र. ७० व बाला कंम्पाऊंड येथे ८ वी ते १० वी पर्यंतचे २२ वर्ग असून एकूण १११८ विद्यार्थी शिक्षण घेत असताना महापालिकेच्या शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी यांनी ३५ शिक्षकांऐवजी फक्त १५ शिक्षक उपलब्ध करुन दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उर्दू माध्यमिक शाळेत शिक्षक उपलब्ध करून देण्याबाबत व उर्दू माध्यमाच्या शाळा बंद न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) होय.

असे निवेदन भिवंडी शहर महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

शांतीनगर उर्दु माध्यमिक विद्यालयाची सन २०१५-१६ च्या संच मान्यतेनुसार अनुज्ञेय असलेल्या १२ शिक्षक संख्येपेक्षा ३ अतिरिक्त शिक्षक सदर विद्यालयात कार्यरत आहेत.

तसेच महानगरपालिकेच्या चव्हाण कॉलनी व गैबी नगर येथील प्राथमिक उर्दु शाळा क्र. ६२ व २२ च्या इमारती धोकादायक झाल्याने तेथील शाळा महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा क्र. ७० येथे स्थलांतरीत करणेत आले आहेत व तेथे वर्ग सुरु आहेत. कोणतीही प्राथमिक अथवा माध्यमिक शाळा बंद करणेचा निर्णय महानगरपालिकेच्या प्रशासनाने घेतलेला नाही.
(२) सन २०१५-१६ च्या संच मान्यतेनुसार (शाळेतील विद्यार्थी संख्येनुसार) महानगरपालिकेच्या शांतीनगर उर्दु माध्यमिक विद्यालयास एकुण १२ शिक्षकांची पदे मंजुर आहेत व सद्यस्थितीत सदर विद्यालयात एकुण १५ शिक्षक हे स्थायी स्वरुपात कार्यरत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेबाबत

(२०) ६७७९९ (१६-०१-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या बसेस प्रवाशांना सध्या त्रासदायक ठरत असुन पावसामुळे बस बंद पडण्याच्या घटना वाढल्या आहेत तसेच कोलमडलेल्या वेळापत्रकामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिवहन सेवेची तक्रार करण्यासाठी प्रवाशांकरीता कोणतीही तक्रार निवारण यंत्रणा अस्तित्वात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील प्रवाशांची दखल घेऊन परीवहन सेवा सुधारण्याबाबत व तक्रार निवारण यंत्रणा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) माहे ऑगस्ट, २०१६ या महिन्यात दैनंदिन सरासरी १५ ते १८ बसेस मार्गावर नादुरुस्त झालेल्या आहेत. बस नादुरुस्त झाल्यानंतर बसमधील प्रवाशांना इच्छित स्थळी पाठविण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात येते.

(२) व (३) ठाणे महानगरपालिकेतर्फे परिवहन सेवा सुधारण्याबाबत व तक्रार निवारण करण्याकरीता खालील प्रमाणे सुविधा उपलब्ध आहेत:-

i. प्रवाशांना आपली तक्रार करण्यासाठी परिवहन सेवेच्या महत्वाच्या टर्मिनसवर (चौक्यावर) सूचना/तक्रार पुस्तिका ठेवण्यात आली आहे.

ii. प्रवाशांना याकरीता परिवहन सेवेतर्फे टोल फ्री क्रमांकाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

iii. प्रवाशांना त्यांच्या सुचना/तक्रार करण्यासाठी ई-मेलची सुविधा उपलब्ध आहे.

iv. परिवहन सेवेच्या कळवा व वागळे आगार येथील नियंत्रण कक्षामध्ये दुरध्वनी उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार महापालिकेकडे (जि.पालघर) ठेकेदारांची देयके थकीत असल्याबाबत

(२१) ६८६३१ (१६-०१-२०१७). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर),

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महापालिकेकडे (जि.पालघर) ठेकेदाराची देयके थकीत असल्यामुळे ठेकेदारांनी त्यांच्याकडे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन दिले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) नाही.

माहे सप्टेंबर, २०१६ ची देयके वसई-विरार महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडे प्रलंबित नसल्याचे आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रातील मालमत्ताधारकांपैकी केवळ २० टक्के मालमत्ताधारक कर भरत असल्याबाबत

(२२) ६९६८४ (१६-०१-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रातील १ लाख ६५ हजार मालमत्ताधारकांपैकी केवळ २० टक्के मालमत्ताधारक कर भरत असून उर्वरित ८० टक्के मालमत्ताधारक वर्षानुवर्षे करांचा भरणा करत नसल्याचे दिनांक ९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अनेक वर्षापासून शासनाची फसवणूक करणाऱ्या सदर मालमत्ता धारकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) महानगरपालिका क्षेत्रातील थकबाकी कर न भरणाऱ्या मालमत्तावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ नुसार चालु आर्थिक वर्षात कर वसुली करिता सक्तीच्या उपाययोजना अंतर्गत जप्ती व नळ कनेक्शन खंडीत करण्याची कारवाई केली जात आहे.

सदर कारवाई दरम्यान आजपर्यंत ४६७ मालमत्तांची जप्ती व १३२८ नळ कनेक्शन खंडीत करणेत आले आहेत. तसेच जप्ती केलेल्या मालमत्तांची थकबाकी वसुली न झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कराधान नियम ४२ प्रमाणे सदर मालमत्तेचा जाहीर लिलावाबाबतची प्रक्रिया महापालिका स्तरावर करण्यात येणार आहे.

तसेच याप्रकरणी आयुक्त, भिवंडी निजामपूर महानगरपालिका यांना मालमत्ता कर वसूल न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंब्रा येथील ऐतिहासिक रणगाड्याबाबत

(२३) ७०२०६ (१६-१२-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारत पाक युध्दात शौर्याचे प्रतिक ठरलेल्या व मुंब्रा येथे ऐतिहासिक आठवण म्हणुन ठेवण्यात आलेल्या वैजयंता या रणगाड्यावर भिकारी, गर्दुल्ले व दारूडे यांनी कब्जा केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रणगाड्याच्या सभोवतल केलेले सुशाभिकरण व वीजेचे प्रकाशझोत नष्ट झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रणगाड्यावर कायमस्वरूपी सुरक्षारक्षक ठेवण्याबाबत व शहिद स्मारकाचे पुन्हा सुशोभिकरण करण्याबाबत काय उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.
(३) ठाणे महानगरपालिकेने सदर रणगाडयावर कर्मचारी नेमले आहेत. तसेच शहिद स्मारकाचे सुशोभिकरण पुर्ण केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महापालिकेतील रिक्त पदांबाबत

(२४) ७०२१८ (१६-१२-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहराचा झपाट्याने वाढत चाललेला विकास व प्रशासकीय कामकाजाचा पसारा विचारात घेता महापालिकेत पुरेसे कर्मचारी व अधिकारी नसल्यामुळे व बहुतांश अधिकाऱ्यांवर चार चार विभागाचा अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे वेळेअभावी ठाणेकरांना दिल्या जाणाऱ्या दैनंदिन सेवांवर विपरित परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहितीच्या अधिकारात मिळालेल्या आकडेवारीनुसार कर्मचारी व अधिकारी व असे एकूण मिळून २०८५ पदे रिक्त असून रिक्त पदांच्या भरतीबाबतचा मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास अद्याप मंजूरी न मिळाल्याने महापालिकेच्या बढती समितीने प्रचलित नियम शिथिल करून शासनाची पुर्वानुमती न घेता थेट भरतीने काही पदे भरली तर काहींना बढती दिली यामुळे काहींवर बढतीबाबत अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महापालिकेने निमयबाहय केलेली बढती रद्द करून संबंधित अधिकाऱ्यांकडे सोपविलेला कार्यभार काढून घ्यावा अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१), (२) व (३) हे खरे नाही.

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ९७१० पदे मंजुर आहेत. तसेच ठाणे महानगरपालिकेचा सेवाप्रवेश नियम व आकृतीबंधावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

ठाणे महानगरपालिकेला मिळालेल्या पदांच्या मंजुरीप्रमाणेच थेट भरतीने पदे भरण्यात आलेली आहे. तसेच नियमानुसार पदोन्नतीने पद भरती करण्यात आली असल्याने बढतीबाबत अन्याय झाला नसल्याचे आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड महानगरपालिकेमधील अवैध कामांबाबत

(२५) ७०६२७ (१६-०१-२०१७). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड महानगरपालिकेमध्ये कंत्राटदारासोबत कार्यकारी अभियंता यांनी अवैध कामे करुन व अवैध एमबी रेकॉर्ड करुन करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) हे खरे नाही
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी शहराला पाणी पुरवठा करणारा राहाटी बंधारा येथील विद्युत पंप नादुरुस्त असल्याबाबत

(२६) ७०६६० (१६-०१-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) शहराला पाणी पुरवठा करणारा राहाटी बंधारा पुर्णपणे भरला असुनसुध्दा तेथील चार विद्युत पंप (मोटर) वारंवार नादुरुस्त असल्यामुळे शहर वासियांना पुरेसा पाणी पुरवठा होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी नवीन मोटारी (विद्युत पंप) बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.
(२) या ठिकाणी नवीन विद्युत पंप बसविण्याचे काम UIDSSMT योजनेत समाविष्ट करण्यात आलेले असुन, या कामाच्या कंत्राटदारांना नवीन पंप बसविण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी (जि.ठाणे) शहरातील न्यू गौरीपाडा कारवली रोड परिसरातील महापालिकेच्या स्मशानभूमीसाठी आरक्षित जागेवरील बांधकामाबाबत

(२७) ७०७५७ (१६-०१-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील न्यू गौरीपाडा कारवली रोड परिसरात महापालिकेच्या स्मशानभूमीसाठी आरक्षित जागेवर बांधकाम केल्याने मुख्य नाल्याचा प्रवाह एकाच जागी थांबल्याने नागरिकांना अनेक समस्यांना समोरे जावे लागत असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रभाग समिती अधिकारी दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.
भिवंडी शहराच्या मंजूर विकास योजनेत न्यू गौरीपाडा कारिवली रोड, परिसरात स्मशानभुमीसाठी आरक्षण दर्शविलेले नाही.
भिवंडी शहराच्या मंजूर विकास योजनेत न्यू गौरीपाडा कारिवली रोड, परिसरात नाला दर्शविलेला नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेने केलेल्या रस्त्यांच्या कामाबाबत

(२८) ७१७४९ (१६-०१-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने सन २००९ ते २०११ या कालावधीत औरंगाबाद शहराच्या हद्दीतील ३४ रस्त्यांचे काम डिर्फेट पेमेंट या योजनेखाली केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांसाठी झालेला एकुण खर्च किती होता व त्यासाठी बँकेचे कर्ज घेण्यात आले होते काय,

(३) असल्यास, कालबध्द कार्यक्रमानुसार ३ वर्षांच्या कालावधीतील या ३४ रस्त्यांची दुरुस्ती संबंधीत ठेकेदारांनी करणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने ठेकेदारांची संपुर्ण देयके अदा केली तसेच या प्रकरणी ठेकेदारावर कारवाई करतानांच, संबंधीत अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) व (२) औरंगाबाद महानगरपालिकेने केलेल्या रस्त्यांच्या कामाबाबत सन २००९ ते २०११ या कालावधीत औरंगाबाद शहराच्या हद्दीतील तसेच एम.आय.डी.सी. चिखलठाणा भागातील अंतर्गत रस्त्यांचे काम डिफर्ट पेमेंट योजनेखाली केले आहे. एकुण ३१ रस्ते होते त्यापैकी २७ रस्ते करण्यात आले आहेत.या कामासाठी एकुण खर्च रक्कम रुपये ५२.६६ कोटी झालेला आहे.त्यासाठी बॅकेचे कर्ज घेण्यात आलेले नाही.

(३) व (४) कालबध्द कार्यक्रमानुसार सदोष दायीत्व कालावधीमध्ये (DLP) निविदेतील अटी/शर्तीनुसार या रस्त्याची दुरुस्ती संबंधित ठेकेदाराने करणे आवश्यक आहे.अद्याप महानगरपालिकेने ठेकेदाराची संपूर्ण देयके अदा केलेली नाहीत.झालेल्या कामापैकी ३०% देयके अदा करण्यात आली आहेत. ठेकेदाराची उर्वरीत देयके देणे बाकी आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी महानगरपालिकेने केलेली भाडेवाढ रद्द करण्याबाबत

(२९) ७२९०४ (१६-०१-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेकडून शहरातील गाळेधारक, ओटेधारक व दुकानदारांवर जाचक भाडेवाढ आकारण्यात येत असून सदर भाडेवाढ रद्द करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने सदरची भाडेवाढ रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) परभणी शहर महानगरपालिकेच्या मालकीचे गाळे व ओट्यांच्या भाड्याचे व अनामत रकमाचे नगररचना विभागाच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे तसेच विहीत पध्दतीने रेडीरेकनरच्या आधारे गाळ्यांच्या भाड्याचे व अनामत रकमेचे मुल्यांकन परभणी महानगरपालिकेने केलेले आहे.

सदर वाढीव भाड्याविरोधात परभणी शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्रं ३० पारित केलेला आहे.तथापी, सदर ठराव आयुक्त,परभणी शहर महानगरपालिका यांच्या शिफारशीनुसार शासनाने दि.०५/०५/२०१७ शासन निर्णयान्वये निलंबीत केलेला आहे.

निलंबीत ठरावाबाबत परभणी शहर मनपा गाळेधारक व्यापारी संघटना यांनी निवेदन दिलेले असुन त्या अनुषंगाने शासन स्तरावर अंतिम निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर महापालिकेत घनकचरा विल्हेवाटीमध्ये झालेला गैरव्यवहार

(३०) ७३९८२ (२०-०४-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर महापालिकेत घनकचरा विल्हेवाटीकरिता झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी मुख्य लेखापरिक्षकांनी लेखापरिक्षण अहवालात एकूण पाच गंभीर मुद्यांचा उल्लेख केला असून त्याबाबतचा अहवाल स्थायी समिती समोर ठेवण्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवाल अद्याप स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहवाल न ठेवण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) व (२) हे खरे आहे.
(३) या प्रकरणी चौकशी करण्यात येत असुन चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर महानगपालिकेची स्थापना झाल्यापासून आजपर्यंत कर्मचारी व अधिकारी यांनी अग्रिम रकमेची केलेली उचल

(३१) ७३९८५ (२०-०४-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर महानगरपालिकेची सन २०११ मध्ये स्थापना झाल्यापासून आजपर्यंत कर्मचारी व अधिकारी यांनी रु. १,४८,३२,७७८/- इतक्या अग्रिम रकमेची उचल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या नावे त्यांनी न मागताच आवेदन पत्राशिवाय ही अग्रीम रक्कम देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील रक्कम तातडीच्या कामांसाठीच वापरणे आवश्यक असतांना राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधीचे स्वागतासाठी होर्डींग तसेच नगरसेवक/ पदाधिकारी यांचे पर्यटन व प्रशिक्षणाकरीता वापरण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक कर्मचाऱ्यांच्या नावावर अग्रीम देण्यात आली त्यांची अन्यत्र बदली झाली असून काही निवृत्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत तक्रार दाखल झाल्यानंतर असमायोजित रक्कम समायोजित करण्यासाठी संबंधितांना नोटीस जारी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर अग्रीम रकमेविषयी मा. सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांचेकडे असमायोजित रकमेविषयी केलेल्या तक्रारीनुसार काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) व (२) लातूर महानगरपालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंत विभागप्रमुख यांच्या शिफारशीनुसार व कामाची निकड लक्षात घेता अधिकारी व कर्मचारी यांना एकुण रु.१,४८,६२,७८६/- इतकी अनामत रक्कम देण्यात आलेली होती.

(३) व (४) सदरील रकमेचे अनामत पोटनिवडणुक भत्ता वाटप, अग्निशामन विभाग किरकोळ दुरुस्ती, न्यायालयीन प्रकरणे, गणेश विसर्जन सोहळा, कचरा मशीन दुरूस्ती, पाणी पुरवठा किरकोळ कामे, नवीन विद्युत पंपाचे लाईन कनव्हर्शन डिमांड, संगणक साहीत्य दुरूस्ती, कॅव्हेट दाखल करणे, लोकप्रतिनिधींच्या स्वागतासाठी होल्डींग, नगरसेवकांचे प्रशिक्षण याकरिता अनामत म्हणुन देण्यात आलेले आहेत.

अनामत रक्कम दिलेल्या कर्मचाऱ्यांपैकी ४ अधिकाऱ्यांची नगरपालिका सेवासंवर्ग अंतर्गत लातुर जिल्ह्यातील अन्य नगरपालिकेत बदली झालेली आहे. उर्वरीत सर्व कर्मचारी लातुर शहर महानगरपालिकेत सध्या कार्यरत असुन अनामत रक्कम दिलेल्या कर्मचाऱ्यांपैकी कोणीही कर्मचारी सेवानिवृत्त झालेला नाही.

(५) व (६) याबाबतची तक्रार महापालिकेस प्राप्त होण्यापूर्वीच अधिकारी व कर्मचारी यांनी खर्चाची देयके सादर करुन रु.१,०१,३१,२८८/- इतक्या रकमेचे समायोजन केलेले आहे.

उर्वरित अनामत शिल्लक रक्कम संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन माहे जानेवारी २०१७ पासून रोखून ठेवले असून लातुर शहर महानगरपालिकेकडून याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर येथील हनुमान चौक येथे आर.आर.टॉवर्स या इमारतीमध्ये मंजूर आराखड्यापेक्षा अनधिकृत वाढीव बांधकाम केल्याबाबत

(३२) ७३९८६ (२०-०४-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील हनुमान चौक येथे आर.आर. टॉवर्स या इमारतीमध्ये मंजूर आराखड्यापेक्षा अनधिकृत वाढीव बांधकाम केल्याबद्दल महापालिकेने दिनांक २२ ऑगस्ट, २०१५ रोजी प्रत्यक्ष पाहणी अहवाल, पंचनामा करुन वाढीव बांधकामा विरोधात एफ.आय.आर. दाखल केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या नगर रचना विभागाने अनधिकृत बांधकामाविरुध्द कलम-५३ ची नोटीस न जारी केल्यामुळे न्यायालयाने तांत्रिक आधारावर केस निकाली काढली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जाणीवपूर्वक तांत्रिक चूक ठेवल्यामुळे त्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजी तक्रार दाखल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत पालिकेकडून काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) या प्रकरणी चौकशी करण्यासाठी उपायुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर शहरातील सीसीटीव्ही प्रकल्प निकृष्ठ दर्जाचा असल्याबाबत

(३३) ७४०३१ (२०-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील सुरक्षितेसाठी शहरात बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे निकृष्ठ दर्जाचे असून या प्रकल्पाला दुप्पटीपेक्षा जास्त रक्कम दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

कोल्हापूर सुरक्षित शहर प्रकल्पाकरीता रितसर निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन जागतिक स्तरावरील नामांकित कंपनींचे कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

सदर प्रकल्पा अंतर्गत पहिल्या टप्प्यात कोल्हापूर महापालिकेच्या निधीमधून रुपये ५.५० कोटी व जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त निधी रुपये २ कोटी अशा एकूण ७.५० कोटी निधी मधून शहरातील ६५ ठिकाणी एकूण १६५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

सदर सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे तांत्रिक लेखापरिक्षण डॉ.डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग यांच्या मार्फत तसेच महापालिकेने नेमलेल्या त्रिस्तरीय समिती मार्फत करण्यात आले आहे.

लेखापरिक्षण अहवालात सदर प्रकल्पाचे साहित्य व कॅमेरे बसविण्याचे काम तांत्रिक दृष्टया योग्य असल्याचे नमुद केले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

माथेरान येथील शाळा विद्यार्थी संख्येमुळे बंद पडण्याच्या मार्गावर असल्याबाबत

(३४) ७४०५३ (२१-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान यथील सध्या अस्तित्वात असलेल्या शाळा विद्यार्थी संख्येमुळे बंद पडण्याचा मार्गावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळा वाचविण्याकरिता नगरपरिषदेने फक्त पहिली ते सहावीपर्यंतच्या वर्गाची शाळा चालवावी आणि गव्हाणकर एज्यूकेशन ट्रस्टने सातवी ते दहावी पर्यंतची शाळा चालवावी असा तोडगा नगराध्यक्षांना माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तोडग्यावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय, हे अंशत: खरे आहे.

गव्हाणकर एज्युकेशन ट्रस्ट व्दारा संचालित प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर खाजगी शाळेचे अनुक्रमे सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षामध्ये पाचवी, सहावी, सातवीचे वर्ग विद्यार्थी संख्येअभावी बंद करण्यात आले आहेत.

(२) व (३) पहिली ते आठवीचे वर्ग नगरपरिषदेने चालवावेत व आठवी ते दहावी पर्यंतचे वर्ग गव्हाणकर एज्युकेशन ट्रस्ट व्दारा संचालित शाळेव्दारा चालविली जावेत असा ठराव नगरपरिषदेने दि. १७/०३/२०१७ रोजी केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौ.बाळकुम (जि.ठाणे) येथे महानगरपालिका हद्दीतील इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

(३५) ७४४१७ (२०-०४-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.बाळकुम (जि.ठाणे) येथे महानगरपालिका हद्दीतील विकास प्रस्ताव क्र. ८८१०/ टी.एम.सी./टी.डी.डी./१५ दिनांक ०१ एप्रिल, १९९२ अन्वये मंजूर आराखड्याची संपूर्ण कागदपत्रे ठाणे महानगरपालिका यांचेकडून नागरी जमिन कमाल धारणा सन १९७६ अंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराची अधिक चौकशी करण्याकरिता ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी ताब्यात घेऊन जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये स्पेशल सुट नं. १५/२००० करीता दाखल केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजूर आराखड्यातील काही इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास वास्तुविशारद, ठाणे यांचेकडून प्राप्त झाल्यावर भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येईल अशा प्रकाराची उत्तरे शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका यांनी दिनांक १७ ऑक्टोबर, १९९८ अन्वये वास्तुविशारदांना दिली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्पेशल सुट नं. १५/२००० च्या दाव्याचा निकाल दिनांक २० मार्च,२०१३ रोजी लागल्याबाबत इमारतीची संस्था यांनी दिनांक १५ मार्च, २०१६ व दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी तसेच वास्तुविशारद यांनी दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ चे अर्जासोबत कोर्टाची निकालप्रत देऊनही शहर अभियंता, ठाणे महानगरपालिका यांचेकडून भोगवटा प्रमाणपत्राच्या प्रतिक्षेतील अर्जदारांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यासाठी हेतूपूरस्सर कोणतेही प्रयत्न केले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोर्टाच्या दिनांक २० मार्च, २०१३ चे निकालानंतर संबंधित यंत्रणेकडून कागदपत्रे ताब्यात घेऊन या मंजूर आराखड्यातील इमारतींच्या वास्तुविशारद यांनी आवश्यक कागदपत्रांसह दिनांक २० सप्टेंबर, १९९८ अन्वये केलेल्या अर्जानुसार व तद्नंतरही दिलेल्या स्मरणपत्रानुसार इमारतीची पाहणी करुन भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत महानगरपालिकेकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय.

(२) ठाणे महानगरपालिकेने विकास प्रस्ताव क्र. ८८०१० ची नस्ती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे यांचेकडे हस्तांतरीत केली आहे. तसेच अद्यापही सदर चौकशी पुर्ण न झाल्याने सदर मंजूर आराखड्यातील काही इमारतींना वापर परवाना देण्यात आला नसल्याने ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) या संदर्भातील सर्व न्यायालयीन प्रकरणात संबंधित न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयाचे अनुपालन करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त श्री.अच्युत हांगे यांनी त्यांच्या कार्यकाळात शासनाचे सर्व नियम डावलून केलेल्या बढत्या

(३६) ७४५४४ (२०-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त श्री.अच्युत हांगे यांनी त्यांच्या कार्यकाळात सन २०१३ मध्ये वा त्या सुमारास शासनाचे सर्व नियम डावलून महानगरपालिकेमध्ये ७५ व्यक्तींना सर्वसाधारण सभेला हाताशी धरुन मनमानीपणे अधिकारी व कर्मचाऱ्यांना पात्रता नसतानाही भरमसाट बढत्या देऊन गैरव्यवहार केल्याची बाब दिनांक २० नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरप्रकारे करण्यात आलेल्या बढत्या व बदल्यांविरोधात लोकायुक्तांकडे दाखल झालेल्या तक्रारीनंतर नगरविकास विभागाने कोकण विभागीय आयुक्तांची चौकशी नेमल्यानंतर या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून या अहवालानुसार पात्रता नसताना देण्यात आलेल्या ७५ पदोन्नत्या रद्द करुन दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्याचे आदेश नगरविकास विभागाला देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या ७५ व्यक्तींना बेकायदेशीर नियमबाहय बढत्या व पदोन्नत्या देण्यात आल्या होत्या त्यांच्या केलेल्या चौकशीमध्ये कोणकोणत्या गोष्टी निदर्शनास आल्या व या सर्व गैरव्यवहार व गैरकारभारास जबाबदार असलेल्या तत्कालिन आयुक्त श्री.अच्युत हांगे यांचेविरोधात काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१), (२) व (३) या प्रकरणी, ७५ अधिकाऱ्यांना पदोन्नती दिलेली नसून २३ अधिकाऱ्यांना पदोन्नती दिलेली आहे. सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांना दोषी अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तद्नुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगविषयक कारवाई सुरू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी-निजामपूर शहर (जि.ठाणे) महानगरपालिकेची इमारत तारण ठेवण्यात आल्याबाबत

(३७) ७६०६५ (२०-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर शहर (जि.ठाणे) महापालिका प्रशासनाने पालिका कार्यक्षेत्रातील भुयारी गटार योजनेसाठी हुडकोकडून घेतलेल्या ८९ कोटी कर्जासाठी महापालिकेची इमारत प्रशासनाने तारण ठेवल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून अनुदानाचे धनादेश वेळेवर मिळत नसल्यामुळे गत दोन महिन्यांपासून कामगारांचे वेतन अदा करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) होय हे खरे आहे.

(२) भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने माहे मे, २०१७ पर्यंतचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन अदा केले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर महानगरपालिकेच्या महासभेत कळमकर महापौर असतानाच्या कार्यकाळातील ५२ रस्त्यांच्या कामांच्या चौकशी करण्याबाबत

(३८) ७६६१७ (२०-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिकेच्या महासभेत कळमकर महापौर असतानाच्या कार्यकाळातील ५२ रस्त्यांच्या कामांची चौकशी अहवालाची मागणी नगरसेवक कैलास गिरवले यांनी केली असल्याची माहिती दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मूलभूत विकास निधीतून प्रेमदान चौक-प्रोफेसर कॉलनी चौक ते टी.व्ही. सेंटर दरम्यान पथदिवे सुस्थितीत असतांना ४८ लाख रुपये खर्च करुन नविन बनावट पथदिवे लावल्याचीही तक्रार सचिव, नगर विकास विभाग व लोकायुक्त व आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांचेकडे केली असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले व गैरव्यवहार करणाऱ्या सर्व संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) होय.

(२) अशा प्रकारची तक्रार आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांच्याकडे प्राप्त झालेली होती.

महानगरपालिकेमार्फत सदरचे विद्युतीकरणाचे काम मूलभूत विकास निधीतून न घेता मागासक्षेत्र विकास अनुदान निधी (B.R.G.F.) मधून प्रस्तावित केलेले असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.

(३) सदर प्रकरणी अतिरिक्त आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांचेमार्फत सविस्तर चौकशी करण्यात आली. सदर तक्रारीत तथ्य नसल्याचे आढळून आल्यामुळे, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही. याबाबत तक्रारदार यांना महानगरपालिकेमार्फत दि.०२.०२.२०१७ रोजी कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेमध्ये नव्याने घेण्यात आलेल्या बसेसचे टायर व बॅटरी जुन्या असल्याबाबत

(३९) ७६९५७ (२१-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेमार्फत १९० बसेसची खरेदी करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी ५० बसेस खरेदी करण्यात आल्या असून सदर बसेसचे टायर व बॅटरी जुन्या असल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०१६ रोजी वा सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी परिवहन सदस्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले आहे व जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.

ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेत जवाहरलाल नेहरू नागरी पुर्नरुत्थान योजने अंतर्गत १९० बसेस प्राप्त होणार आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

परिवहन सेवेकडे नव्याने प्राप्त होणाऱ्या बसेसची अंतिम स्तरावरील संयुक्त तांत्रिक तपासणी तृतीय पक्षीय तपासणीकार मुळ उत्पादक व ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेकडील तांत्रिक अधिकारी यांनी केली असता बसेसचे काही टायर व बॅटरी यांचे उत्पादन आधीचे वर्षाचे असल्याने सदरचे टायर व बॅटरीज बदली करुन व इतर तांत्रिक त्रुटीची तातडीने पुर्तता करणेबाबत पुरवठादारांना कळविण्यात आले.

त्यानुषंगाने मुळ पुरवठादाराने १२० टायर व दिनांक २४.११.२०१६ रोजी १६ बॅटरीज बदली करुन दिलेल्या आहेत.

(३) परिवहन सदस्यांनी याबाबत तांत्रिक त्रुटी दुर करुन मगच बसेस ताब्यात घ्याव्यात व या त्रुटींबाबत संबधित कंपनीकडे कारण मिमांसा मागण्यात यावी अशा आशयाचे पत्र दिलेले आहे.

(४) याप्रकरणी मुळ पुरवठादार यांनी संबधीत बसेसवरील जुन्या बॅटरीज, टायर्स बदलून दिल्याने या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण (जि.ठाणे) मधील आधारवाडी डंम्पीग ग्राऊंडबाबत

(४०) ७७४८८ (२०-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) मधील आधारवाडी डंम्पीग च्या प्रश्नाबाबत न्यायालयाच्या आदेशानंतरही कल्याण-डोंबिवली महानगरपालिका दुर्लक्ष करित असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१७ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत हरीत लवादाने मा.आयुक्तांना सुनावणीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावर कोणत्या तातडीच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) नाही.

मा.न्यायालयाच्या आदेशापूर्वी व आदेशानंतरही आधारवाडी डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न सोडविण्याकरीता कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सातत्याने प्रयत्न करीत आहे.

(२) होय.

आधारवाडी डम्पिंग ग्राऊंडसह पूर्ण कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाकामी तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्यावर निवेदन करण्याकरीता राष्ट्रीय हरित लवादाने दि.१०/०१/२०१७ रोजी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना हजर राहण्याचे आदेश दिले होते.

(३) महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन करण्याकरीता घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अन्वये कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी महानगरपालिकेकडून सुरु आहे. त्याबाबतचे हमीपत्र महानगरपालिकेने दि.२४/०३/२०१७ रोजी राष्ट्रीय हरित लवाद यांच्याकडे सादर केले असून महानगरपालिकेकडून पुढीलप्रमाणे अंमलबजावणी सुरु आहे :-

(i) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये मौजे उंबर्डे, बारावे व मांडा या ३ ठिकाणी शास्त्रोक्त भरावभूमी उभारण्याच्या कामाचे दि.१७/०४/२०१७ रोजी आदेश देण्यात आले आहेत.

(ii) महानगरपालिका क्षेत्रात १३ ठिकाणी विकेंद्रीत पद्धतीने बायोगॅस प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्यापैकी ६ ठिकाणी प्रकल्प उभारणीचे काम सुरु असून मौजे उंबर्डे व मौजे आयरे येथील काम अंतिम टप्प्यात आहे.

(iii) कचरा संकलन व वाहतूकीसाठी वाहने खरेदी करणे, जनजागृती करणे, कचरा वर्गीकरणासाठी शेड उभारणे याकामी निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(iv) आधारवाडी क्षेपणभूमी शास्त्रोक्तरित्या कायमस्वरुपी बंद करण्यासाठी दि.१७/०४/२०१७ रोजी कामाचे आदेश देण्यात आले असून त्याकरीता किमान ३ वर्षांचा कालावधी लागणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवीमुंबई महापालिकेत खासगी कंपनीद्वारे (आऊट सोर्स) सुरु असलेल्या भरतीबाबत

(४१) ७८१३६ (२१-०४-२०१७). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महापालिकेत खासगी कंपनीद्वारे (आऊट सोर्स) ५०० कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत सुरु असलेल्या प्रक्रियेत ठराविक कंपनीलाच कंत्राट दिले गेल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भरती प्रक्रियेची निविदा वर्तमान पत्रात न देता फक्त ऑनलाईन मार्फत शुद्धीपत्रक काढण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेकरीता बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यासाठी दि.१५/०८/२०१६ रोजी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच दैनिक सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, मिड-डे, दि फ्रि प्रेस जरनल आणि द इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रात प्रथम निविदा देकार सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती.

निविदापूर्व बैठकीमध्ये निविदाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरण व त्यानुसार शुद्धीपत्रक क्र.१ दि.२४/०८/२०१६ रोजी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच दि.०७/०९/२०१६ रोजी दैनिक सकाळ, महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आले. तसेच माहे सप्टेंबर, २०१६ ते माहे नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत शुद्धीपत्रके प्रसिद्ध करण्यात आली.

याबाबत प्राप्त निविदांचे तांत्रिक अटी-शर्तीनुसार, पूर्वअर्हता व तांत्रिक मुल्यांकन करुन, त्यामधील पात्र निविदाकार मे.एस-२ इन्फोटेक प्रा.लि. यांची निविदा उघडण्यात आली. सदर निविदा महानगरपालिकेच्या स्थायी समितीने ठराव क्र.१३६, दि.१८/०३/२०१७ अन्वये नामंजूर केली.

तथापि, सदर ठराव विखडीत करण्याबाबतचा प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या दि.२२/०३/२०१७ च्या पत्रान्वये शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी महानगरपालिकेत (जि.ठाणे) विविध ठिकाणी पाणीपुरवठा करण्याबाबत

(४२) ७८७९२ (२१-०४-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील (जि.ठाणे) नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्याकरीता एकात्मिक पाणीपुरवठा योजने अंतर्गत पालिका प्रशासनाने शहरात विविध ठिकाणी पाच वर्षांपूर्वी १२ ते १३ कोटी रुपये खर्च करुन १६ पाण्याच्या टाक्या बांधल्या परंतु सदर टाक्यांचे बांधकाम अर्धवट स्थितीत राहिल्याने यापैकी एकाही टाकीचा उपयोग पाणी साठविणे वा वितरण याकरीता होत नसल्याची बाब दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास, निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ११ मार्च, २०१२ रोजी यापैकी काही टाक्यांची उद्घाटने करण्यात आली असून अद्यापी सदर टाक्यांमधून नागरिकांना पाणी मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी शिवाजी चौक ते संगमपाडा या मार्गावर नागरिकांनी भिवंडी महानगरपालिकेच्या निषेधार्थ मोर्चा काढून सर्व टाक्या पाणी पुरवठा करण्याकरीता सक्षम करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १२ ते १३ कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या १६ टाक्यांमध्ये पाण्याची साठवणूक व वितरण कधी सुरु होणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) हे अशंत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) २५ द.ल.लि. पाणी पुरवठा योजने अंतर्गत एकुण बांधण्यात आलेल्या १४ जलकुंभापैकी ४ ठिकाणी जलवाहिनी टाकण्याचे काम पुर्ण झाले असून सदर जलकुंभाचे जलदाब चाचणी घेणेचे काम सुरु आहे.

- ❖ कोंबडपाडा येथे बांधण्यात आलेला उंच जलकुंभ भरण्यासाठी जलकुंभाच्या पंपगृहाची स्थापत्य कामे पुर्ण झालेली असून या पंपगृहामध्ये पंपींग मशीनरी बसविण्याचे काम सुरु आहे.
- ❖ केंद्र शासनाच्या अमृत अभियाना अंतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेकरीता १०० द.ल.लि. पाणी पुरवठा योजना मंजूर झाल्यानुसार जलकुंभ भरण्यासाठी पाणी कोठा उपलब्ध आहे.

- ❖ मात्र अमृत मिशन योजनेअंतर्गत या कामाची ई निविदा प्रक्रीया करण्यात आली असून सदर कामास प्रतिसाद न मिळाल्याने आठव्यांदा निविदेस शुध्दीपत्राद्वारे मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
- ❖ सदर जलकुंभ वापरात आणण्यासाठी १०० द.ल.लि. इतके पाणी भातसा जलस्त्रोतातून उचलण्याचे नियोजन केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव व धुळ्यात स्वच्छता अभियान राबविण्यात येत असल्याबाबत

(४३) ७९०३८ (२१-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव व धुळ्यात गत दोन ते अडीच महिन्यांपासून स्वच्छता अभियान राबविण्यात येऊन केंद्र शासनाच्या समितीने प्रत्यक्ष पाहणी करून गेल्यावर हे स्वच्छता अभियान बंद करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ अनुदानाकरिताच स्वच्छता अभियान राबविण्याऱ्या महापालिका प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहरासाठी जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियांनाअंतर्गत मुकणे धरणातुन थेट पाईप लाईन योजनेबाबत

(४४) ७९२८१ (२०-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरासाठी केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियांनाअंतर्गत मुकणे धरणातुन थेट पाईप लाईन योजनेचे काम सन २०१३ मध्ये मंजुर झालेले असून याकामाची अंतिम मुदत ही माहे मार्च, २०१७ मध्ये संपुष्टात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु योजनचे काम हे अतिशय संथ गतीने सुरु असल्याने मुदतीत योजना पुर्ण न झाल्यास महानगरपालिकेवर २०० कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा भार हा शहरातील नागरीकांवर पडणार असल्याने या योजनेच्या विलंबास जबाबदार असलेल्या महानगरपालिकेचे अधिकारी संबधित कंत्राटदार यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएम अंतर्गत नाशिक शहराला मुकणे धरणातून थेट पाणीपुरवठा करण्याच्या योजनेस सन २०१३ मध्ये मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून मार्च, २०१७ अखेर निधी उपलब्ध होणार होता, हे खरे आहे.

(२), (३) व (४) • सदर प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनुज्ञेय निधी नाशिक महानगरपालिकेस मार्च, २०१७ पूर्वी प्राप्त झाला आहे.

• सदर प्रकल्पासाठी आवश्यक महानगरपालिका हिश्याचा निधी उभा करुन प्रकल्पाचे काम मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याच्या सुचना नाशिक महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

परभणी शहरात महापालिकेद्वारे दररोज ९० टन कचरा संकलित केला जात असल्याबाबत

(४५) ७९२८४ (२१-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरात महापालिकेद्वारे दररोज ९० टन कचरा संकलित केला जात असून या कच-यावर प्रकिया करण्याचा कोणताच प्रकल्प महापालिकेकडे उपलब्ध नसल्याने हा कचरा डपिंग ग्राऊंडवर तसाच पडून असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वचछ भारत सर्व्हेक्षणात शहरातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे संकलन आणि त्यावरील केली जाणारी प्रकिया यासाठी शहराला गुण देण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कचरा संकलित न करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर शासन स्तरावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) परभणी महानगरपालिकेमार्फत शहरात निर्माण होणारा घनकचरा संकलित केला जात असून सद्यस्थितीत संकलित करण्यात येणारा हा कचरा डंपिंग ग्राऊंडवर जमा करण्यात येत आहे. तथापी, संकलित करण्यात येत असलेल्या कचऱ्यावर तूर्तास कोणतीही प्रक्रिया करण्यात येत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) परभणी महानगरपालिकेमार्फत शहरात निर्माण होणारा घनकचरा संकलित केला जात आहे. परंतु, त्या कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया करण्यात येत नाही. परभणी महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी स्वच्छ भारत अभियानांतर्गत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार महानगरपालिकेचे (जि.ठाणे) बांधकाम अभियंता श्री.स्वरुप खानोलकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या पार्टीबाबत

(४६) ८००८१ (२१-०४-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेचे (जि.ठाणे) बांधकाम अभियंता श्री.स्वरुप खानोलकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या पार्टीमध्ये पालिकेचे १२ अभियंते मद्यधुंद अवस्थेत सिनेमा संगिताच्या तालावर अश्लिल नृत्य करित असतांना त्या पार्टीमध्ये वसई-विरार पालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम करणारे बिल्डरही सहभागी असल्याची चित्रफीत व्हायरल झाल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मद्यधुंद व अनधिकृत बांधकाम करणाऱ्या बिल्डरांशी हितचिंतक असणाऱ्या संबंधित अभियंत्यांची चौकशी पालिकेच्या आयुक्तांनी वा शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१), (२) व (३) होय.

याप्रकरणी वसई-विरार महानगरपालिका स्तरावर चौकशी करण्यात येत आहे. तसेच चौकशी पुर्ण होईपर्यंत पार्टीमधील सर्व ठेकेदारांना महानगरपालिकेने ठेक्यातून कमी केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महापालिका ३७६ कलमान्वये उद्योगांच्या परवाना फीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वाढ करीत असल्याबाबत

(४७) ८१५७६ (२१-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम ३१३ तरतुदीमध्ये नगर विकास खात्याने सन २०१५ मध्ये सुधारणा करून एम.आय.डी.सी ने अधिसूचित केलेल्या क्षेत्रामध्ये उद्योगांना व्यवसाय करणे सोपे जावे या कारणाने हा बदल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महापालिका ३७६ कलमान्वये उद्योगांच्या परवाना फीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वाढ करीत असून सदर वाढ बेकायदेशीर असल्याची ठाणे स्मॉल स्कील इंडस्ट्रीज असोसिएशनने एका निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये महापालिका ३७६ कलमामध्ये बदल करणार आहे काय,

(४) नसल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

अशा प्रकारचे निवेदन ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३७६ मध्ये साठा परवाना शुल्कामध्ये वाढ करण्याची तरतूद आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या महासभेने ठराव क्र.२७९, दिनांक ०६.०४.२०१५ अन्वये साठा परवाना शुल्कामध्ये वाढ केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची घरे वाचविण्यासाठी सर्वसामान्य २५ घरांवरुन बुलडोझर फिरवीत रस्त्याचे रुंदीकरण केल्याबाबत

(४८) ८२०६१ (२०-०४-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची घरे वाचविण्यासाठी महानगरपालिकेने न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करीत सर्वसामान्यांच्या २५ घरांवरुन बुलडोझर फिरवीत रस्त्याचे रुंदीकरण केल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जय भवानी नगर ते मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन रस्त्याच्या रुंदीकरणादरम्यान सिडकोच्या नकाशाचे अनुपालन न करताच आणि आयुक्तांनी खंडपीठात शपथपत्र दाखल करुनही चुकीच्या पद्धतीने मार्किंग करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिका अधिकाऱ्यांची घरे वाचविण्यासाठी ज्या सामान्य २५ जणांच्या घरांवरुन प्रशासनाने बुलडोझर फिरविले त्या बाधित मालमत्ताधारकांना अद्यापही मोबदला देण्यात आला नाही, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोर्टात चुकीचे शपथपत्र दाखल करुन न्यायालयाची व सामान्यांची दिशाभूल करणाऱ्या संबंधीत दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध करावयाची कारवाई व शासनाची भूमिका काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.

या प्रकरणातील जयभवानी नगर ते मुकूंदवाडी या रस्त्याच्या दोन्ही बाजूस अनधिकृत बांधकामे झालेली असल्यामुळे, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या आदेशानुसार रस्ता विकसित करण्यासाठी उपअधिक्षक, भुमी अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडून संयुक्त मोजणी करुन घेण्यात आली. सदर मोजणीच्या नकाशाच्या आधारे नगररचना विभागामार्फत करण्यात आलेल्या मार्कींगच्या आधारे बाधित होणारीच अनधिकृत बांधकामे तोडण्यात आलेली आहे.

(३) संबंधित बाधित मालमत्ता धारकांनी मालकी हक्काची अधिकृत कागदपत्रे औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये दाखल केल्यास म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ गुंठेवारी कायदा यांचे आधारे त्यांना मोबदला देण्याबाबत महानगरपालिकेमार्फत निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही

भिवंडी शहराची (जि.ठाणे) वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या विचारात घेता रस्ते रुंदीकरणांच्या कामांना मंजूरी मिळण्याबाबत

(४९) ८२३४० (२०-०४-२०१७). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहराची (जि.ठाणे) वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या विचारात घेता शहरातील रस्ते रुंदीकरणांच्या कामांस मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मंजुरीकरीता पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामांस तातडीने मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अंधेरी (मुंबई) येथील कामगार कल्याण भवनात विकास निधीतून चांगल्या दर्जाच्या सोई सुविधा पुरविण्याबाबत

(५०) ८४१८१ (२१-०४-२०१७). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कामगार कल्याण भवन, अंधेरी या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या इमारतीमधील अभ्यासिका, वाचनालय, व्यायामशाळा, बगीचा, खेळाचे मैदान यांची दुर्दशा झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यासिका, वाचनालयाचे अत्याधुनिकरण, जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, लहान मुलांसाठी उद्यानाचे सुशोभिकरण व्यायामशाळेमध्ये अद्ययावत साहित्य पुरविणे इत्यादी कामे स्थानिक लोकप्रतिनिधींनी आपल्या विकास निधीतून करण्याकरीता कल्याण आयुक्त यांना वारंवार कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगार कल्याण आयुक्त यांनी कक्ष अधिकारी, कामगार-१० यांना वेळोवेळी सदरबाबत सर्व लोकप्रतिनिधींचे प्रस्ताव मान्यतेस पाठविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कक्ष अधिकारी, कामगार-१० यांनी सदर प्रस्तावास मान्यता देता येणार नाही असे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कामगार कल्याण भवनातील नागरिकांना चांगल्या दर्जाच्या सोई सुविधा पुरविण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींचा विकास निधी वापरण्यास शासन परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१९-०६-२०१७) :(१) अंशतः खरे आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) होय, नियोजन विभागाने त्याप्रमाणे अभिप्राय नोंदविले असल्यामुळे तसे कळविले आहे.
(५) उपरोक्त शासन पत्र क्र.मकाक-०५/२०१६/प्र.क्र.१३९/काम-१० दिनांक ०२.०८.२०१६ नुसार कळविण्यात आल्यानुसार परवानगी घेण्याकरीता पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(६) लोक प्रतिनिधिंचा निधी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास अनुज्ञेय नसल्याने पुन्हा पत्रव्यवहार करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.